संशोधन आराखडा

"प्रधान आदिवासी जमातीतील स्त्रियांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे समाजशास्त्रीय अध्ययन"
(विशेष संदर्भ : किनवट तालुका)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड सामाजिकशास्त्रे विद्याशाखा अंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच्.डी.पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधिका

कु.मांजरमकर सोनी श्रीरंगराव

एम.ए., एम.फिल. (समाजशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ.चव्हाण ज्ञानेश्वर शेषराव

समाजशास्त्र विभाग,

शारदा महाविद्यालय, परभणी

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल,

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

जून २०१८

प्रधान आदिवासी जमातीतील स्त्रियांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे समाजशास्त्रीय अध्ययन
(विशेष संदर्भ : किनवट तालुका)

१.१ प्रस्तावना :-

भारतातील सर्वात प्राचीन रहिवाशी म्हणून आदिवासी जमातीकडे पाहिले जाते. दुर्गम भागात राहणारा आदिवासी समाज होय. आदिवासीबद्दल सर्वसाधारण लोकांची कल्पना म्हणजे, जंगल दऱ्याखोऱ्यात राहणारे रानटी, जंगली लोक खरे पाहता, आदिवासी हेच या देशाचे मूळ रहिवाशी बाहेरून येणाऱ्या सबळांनी त्यांचे सखल प्रदेश व्यापले आणि त्यांना जंगल दऱ्याखोऱ्याचा आश्रय घ्यावा लागला. ते कायमचे दूर झाले. इतरांनीही त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे शेकडो वर्षे ते अज्ञानी आणि अशिक्षित राहिले तरी ही त्यांनी त्यांची मूळ संस्कृतीचे मूल्ये ही जपली.

जगात आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत दक्षिण आफ्रिकेनंतर भारताचा क्रमांक लागतो. देशातील अर्ध्यापेक्षा अधिक आदिवासी लोकसंख्या मध्यप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, ओरिसा, झारखंड आणि गुजरात या राज्यांमध्ये आहे. आदिवासी लोकसंख्येची सर्वाधिक घनता मध्यभारत आणि उत्तरीय राज्यांमध्ये आहे. परंतु हरियाणा, पंजाब, दिल्ली, पाँडिचेरी आणि चंदीगढ वगळता सर्वच राज्ये व संघराज्यांच्या क्षेत्रांमध्ये दिसून येतात. देशातील सवा्रधिक आदिवासी लोकसंख्या असलेले राज्य म्हणजे अरूणाचल प्रदेश, मेघालय, मिझोरम, नागालँड आणि केंद्रशासित प्रदेश असलेले दादरा-नगरहवेली व लक्षद्वीप आहेत. या ठिकाणची आदिवासी लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ५०% पेक्षा अधिक आहे. आदिवासी समुदाय देशातील विभिन्न अशा जंगल, दऱ्याखोऱ्यात कोणीही न पोहचू शकणाऱ्या दुर्गम भागात राहतो.

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची लोकसंख्या १०५१० असून एकूण लोकसंख्येच्या ९.३५% आहे. राज्यात एकूण ४५ आदिवासी जमाती असून, या जमाती

महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यात कमी-अधिक प्रमाणात आढळून येतात. महाराष्ट्रात ठाणे, पालघर, नंदुरबार, नाशिक, अमरावती, गडचिरोली, जळगाव, अहमदनगर, धुळे, पुणे, रायगड, यवतमाळ, गोंदिया, चंद्रपूर, नांदेड व नागपूर अशा सोळा जिल्ह्यात आदिवासींचे वास्तव्य मोठ्या प्रमाणात आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीपासून आजपर्यंत बहुतांश समाजाचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय विकास झाल्याचे सर्वसामान्यपणे दिसून येते. पण आदिवासी समाज अजूनही विकासापासूनच दूरच आहे. सरकारने आदिवासी लोकांचा विकास करून त्यांना मूळ प्रवाहात आणण्यासाठी विकासाचे अनेक कार्यक्रम राबवले. त्यासाठी त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय विकासावर भर दिला परंतु दुर्दैवाने या दोन्ही गोष्टी आदिवासींपर्यंत पोहचू शकल्या नाहीत, त्यामुळे आदिवासी समाज अजूनही विकासापासून दूरच आहे.

पारंपरिक विचारात स्त्रियांकडे एक उदासिन आणि परावलंबी अस्तित्त्व अशा साच्यामध्ये बघितले जाते. तर पुरुषांना मात्र कृतिशील स्वतंत्र व्यक्ती असे मानले जाते. पारंपरिक भूमिकानुसार स्त्रियांना गृहिणी आणि पुरुषांना पोषणकर्ता मानले गेल्याने लग्न आणि कुटुंब या संस्था स्त्रियांना दुय्यम महत्त्व देण्यामध्ये पायाभूत ठरतात. लैंगिक विषमतावादी गैरसमज आणि भेदभाव केला गेल्याने समकालीन समाजामध्ये सर्व ठिकाणी स्त्रिया दुय्यम बनविल्या जातात. उदा. आपल्या समाजातील शिक्षणसंस्था, साहित्य, रोजगाराचा व्यवहार, करारासंबंधी हक्क, संपत्तीविषयक हक्क या सर्वांमधून विविध पुरुष क्षेत्रांमधून स्त्रियांना नेहमीच वगळले जाते. प्रधान आदिवासी जमातीतील स्त्रियांच्या जीवनाचा अभ्यास समाजशास्त्रीय पद्धतीने होणे आवश्यक आहे.

प्रधान आदिवासी जमात ही अतिमागास जमात आहे व या जमातीतील स्त्रियांचे जीवन त्याहूनही दयनीय आहे. प्रधान आदिवासी जमातीतील स्त्रियांच्या सामाजिक व सांस्क्रतिक जीवनाचे समाजशास्त्रीय अध्ययन हा विषय निवडण्याचे एकमेव कारण म्हणजे प्रधान आदिवासी स्त्रियांचे दुर्लक्षित जीवन, या जमातीतील स्त्रिया अत्यंत कष्टमय व संघर्षमय जीवन

जगत आहेत. एकीकडे आज विज्ञानयुगातील स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्य करत आहेत मात्र प्रधान जमातीतील स्त्रिया ह्या दुर्लक्षित जीवन जगत आहेत.

प्रधान जमातीतील स्त्रियांचे जीवन व त्यांना उद्भवणाऱ्या समस्या व प्रश्न यांचे अध्ययन करणे संशोधिकेला महत्त्वाचे वाटते.

प्रधान आदिवासी जमात मागास असून त्यातल्या त्या आदिवासी प्रधान स्त्रियांची स्थिती आणखीनच खालावलेली आहे. प्रधान जमातीतील स्त्रियांच्या विकासाकडे शासनाचे व समाजाचे दुर्लक्ष झाल्यामुळे ही जमात मागास आहे. या संशोधनातून प्रधान जमातीतील स्त्रियांचे प्रश्न व समस्यांकडे लक्ष वेधून त्यांच्या विकासासाठी प्रयत्न केला आहे. जेणेकरून प्रधान जमातीतील स्त्रिया ह्या इतर सर्वसामान्य स्त्रियांसारखे प्रगत जीवन जगू शकतील व त्यातून त्यांचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व मानसिक विकास होईल हा या संशोधनाचा उद्देश आहे.

१.२ संशोधन साहित्याचा आढावा :-

या भागात भारतातील आदिवासी जीवनाचा आर्थिक, सामाजिक, कृषी, व्यावसायिक इत्यादी घटकांचा पाश्चिमात्त्य विचारवंत व भारतीय विचारवंतांनी जे अध्ययन केले त्याचा आढावा घेण्यात आला आहे.

१. डी.एन.मुजुमदार यांच्या मते,

समान नाव धारण करणारा, समान भूप्रदेशात राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा, विवाह, व्यवसाय बाबतीत सारख्याच निषेध-नियमांचे पालन करणारा आणि परस्पर उत्तरदायित्त्व निर्माण करण्याच्या दृष्टिने एक पद्धतशीर व्यवस्था स्वीकारणारा समाज आदिवासी समाज होय.

पूर्वी प्रधान हे गोंडाचे पुरोहित व भाट होते. रूसेल आणि हिरालाल ह्यांनी गोंडाचे किंवा पुजारी म्हणून काम करण्याची प्रधान ही गोंड जमातीची एक कनिष्ठ शाखा असावी असे म्हटले

आहे. प्रधानांना पण, पठारी, देसाई, मोकासी किंवा भाऊ अशी ही नावे होती. प्रधानात राजप्रधान, गोंडाप्रधान, थोटीप्रधान या पोटजाती आहेत. त्यांची आडनावे देवांवरून पडली असून ती पुढीलप्रमाणे आहेत. सातदेव, सहादेव, पाचदेव, चारदेव ही देवके असून त्यांची कुलनामेही गोंडाशी जुळणारी आहेत.

उदा. अत्राम, मसराम, नेताम, सुरपाम, मडावी, टेकाळ, कुरसंगे, थेरमे इत्यादी.

आदिवासी समाज हा इतर कोणत्याही समाजापेक्षा अनेक दृष्टींनी वेगळा असल्याचे प्रचितीस येते. एकंदरीत आदिवासी समाजाविषयी सांगावयाचे झाल्यास समाज जीवन पद्धती एका विशिष्ट भूप्रदेशात निवास, एकाच रक्त संबंधावर आधारित, समान धर्म, स्वतःची वेगळी अशी लिपी विरहित बोलीभाषा, विज्ञानाच्या बाबतीत मागासलेपणा, सामाजिक एकजिनसीपणा, पारंपरिक रूढी-प्रथा-चालीरिती इत्यादी वेगवेगळ्या जोपासणारा समाज म्हणजे आदिवासी म्हणता येईल.

१.३ संशोधनाचा आराखडा :-

संशोधन अध्ययनाचे महत्त्व :-

कुठल्याही समाजाचा दर्जा हा त्या समाजातील स्त्रियांच्या स्थितीवर अवलंबून असतो आणि भारतीय समाज व्यवस्थेत तर स्त्रियांना दुय्यम व गौण स्थान देण्यात आलेले आहे. त्यातल्या त्यात आदिवासी समाज इतर समाजाच्या तुलनेने अतिशय मागास, दुर्गम व डोंगर-कपाऱ्यात राहणारा समुदाय आहे. प्रधान आदिवासी समाजातील स्त्रियांचे जीवन कशा पद्धतीचे आहे? हे जाणून घेण्याचा प्रयत्न करणे, संशोधकाला महत्त्वपूर्ण वाटले. प्रत्येक मानवाच्या जीवनात त्याचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन हे महत्त्वाचे असते. याचा विचार करून प्रधान आदिवासी समुदायातील स्त्रियांचा सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणे हे संशोधिकेला आवश्यक व गरजेचे वाटते आणि हा अभ्यास समाजशास्त्रीय पद्धतीने करून वस्तुस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न संशोधनामार्फत करण्यात येणार आहे.

प्रधान आदिवासी समाजातील स्त्रियांचे सामाजिक जीवन हे प्रधान पुरुषांच्या तुलनेत व इतर सर्वसामान्य स्त्रियांच्या तुलनेत अत्यंत कष्टमय आहे. त्यांच्या समस्या, जीवन संघर्ष, अज्ञान याकडे शासनाचे व समाजाचे दुर्लक्ष असल्यामुळे प्रधान आदिवासी समाजातील स्त्रियांच्या विकासाला गती मिळण्यासाठी सदर संशोधन कार्याची उपयुक्तता सत्कारणी लागावी हा संशोधिकेचा प्रामाणिक हेतू आहे.

१.४ संशोधन समस्या :-

प्रस्तुत संशोधन हे प्रधान आदिवासी जमातीतील स्त्रियांना सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ : किनवट तालुका) आज पर्यंत अभ्यासकांकडून आदिवासींवर संशोधन झाले परंतु, प्रधान आदिवासी स्त्रियांवर संशोधनाचे प्रमाण कमी असलेले दिसून येते. कुठल्याही समाजाचा महत्त्वाचा भाग म्हणजे त्या समुदायातील स्त्री असते आणि प्रस्तुत संशोधनामध्ये किनवट तालुक्यातील आदिवासी समुदायातील स्त्रियांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे समाजशास्त्रीय अध्ययन करून त्याची शास्त्रशुद्ध माहिती घेऊन तथ्य संकलित केली जाणार आहेत. प्रस्तुत संशोधनाच्या आराखड्याचे स्वरूप वर्णनात्मक आहे. या संशोधन आराखड्याचा आधार विश्वसनीय तत्त्व व वास्तविकता हा असतो. म्हणूनच संशोधिकेने सदरील संशोधन कार्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा पद्धतीची निवड केलेली आहे.

१.५ संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

१) प्रधान आदिवासी स्त्रियांच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास करणे.

२) प्रधान आदिवासी समुदायातील स्त्रियांची वर्तमान स्थिती अभ्यासणे.

३) प्रधान आदिवासी स्त्रियांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

४) प्रधान स्त्रियांच्या सांस्कृतिक जीवनासंबंधीचा अभ्यास करणे.

५) प्रधान समुदायातील स्त्रियांची भूमिका व दर्जा यांचा अभ्यास करणे.

१.६ संशोधनाची गृहितकृत्ये :-

१) प्रधान आदिवासींमध्ये इतर स्त्रियांच्या तुलनेत या स्त्रियांचा दर्जा हा दुय्यम व कनिष्ठ आहे.

२) प्रधान आदिवासी समुदायातील स्त्री ही सामाजिक मागासलेली आहे.

३) प्रधान आदिवासी स्त्रियांच्या जीवनावर संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो.

४) विविध सामाजिक कायद्याबद्दल प्रधान आदिवासी स्त्रियांमध्ये अज्ञान आहे.

५) प्रधान आदिवासी स्त्रियांचा साक्षरता दर हा हळुहळू उंचावत आहे.

१.७ संशोधन क्षेत्र :-

प्रधान आदिवासी जमातीतील स्त्रियांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे समाजशास्त्रीय अध्ययन करणे हा प्रस्तुत संशोधनाचा प्रमुख हेतू आहे. आदिवासी प्रधान जमातीतील स्त्रियांचा सामाजिक व सांस्कृतिक अभ्यास करणे. (विशेष संदर्भ : किनवट तालुका) हे क्षेत्र निश्चित केले आहे.

१.८ नमूना निवड पद्धती :-

प्रस्तुत अध्ययनासाठी किनवट तालुका हे कार्यक्षेत्र निश्चित केले आहे. नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्याची सुगम यादृच्छिक न्यादर्श नमूना निवड पद्धतीने निवड केली आहे. किनवट तालुक्यातील प्रधान वस्ती असलेल्या गावांची निवड केली जाणार आहे. त्यापैकी २५० स्त्रिया न्यादर्श निवडला आहे.

१.९ अध्ययनाची मर्यादा :-

प्रस्तुत अध्ययन प्राथमिक, द्वितीय व तथ्य समस्या सामग्रीवर आधारित आहे. प्रस्तुत संशोधन कार्य नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यापुरतेच मर्यादित आहे. यामध्ये किनवट तालुक्यातील प्रधान स्त्रियांचे सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक जीवनाचा अभ्यास करून त्याचे विश्लेषण केले.

१.१० तथ्य संकलन : तंत्र व पद्धती :-

अ) **प्राथमिक सामुग्री :-** यामध्ये नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील निवड केलेल्या २५० स्त्रियांची मुलाखत निरीक्षण या तंत्राचा वापर करून माहिती संकलित केली जाईल. तसेच प्रत्यक्ष सर्वेक्षण करून आकडेवारी गोळा करण्यात येईल.

ब) **दुय्यम सामुग्री :-** दुय्यम सामुग्रीच्या उपलब्धतेसाठी निरनिराळ्या ग्रंथालयांना भेटी देऊन विषयांचे संदर्भ ग्रंथ मिळविले जातील. त्याबरोबर शासकीय अहवाल, रेकॉर्ड, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, नियतकालिके, सरकारी दप्तरातील माहिती, विविध संघटनांचे अहवाल, या दुय्यम सामुग्रीचा उपयोग करून माहिती संकलित केली जाते.

क) **तथ्य संस्करण :-** प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांद्वारे संकलित केलेल्या माहितीचे सारणीकरण, वर्गीकरण, विश्लेषणावरून अहवालाची मांडणी करण्यात येईल. वैज्ञानिक पद्धतीच्या आधारे योग्य निष्कर्ष मांडले जातील. आदिवासी प्रधान जमातीतील स्त्रीजीवनातील प्रश्न, समस्या सोडविण्याच्या अनुषंगाने योग्य उपाययोजनाही मांडल्या जातील.

१.११ अध्ययनाची व्याप्ती :-

प्रस्तुत अध्ययन प्रधान समाजातील स्त्रियांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे समाजशास्त्रीय अध्ययनाअंतर्गत नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील स्त्रियांच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनापुरतेच मर्यादित राहिल.

१.१२ संशोधनाची रूपरेषा :-

प्रस्तुत संशोधनाची विभागणी पुढील सात प्रकरणांमध्ये केलेली आहे.

१. प्रस्तावना

२. संशोधन पद्धती व पूर्वसंशोधन साहित्याचा आढावा.

३. प्रधान आदिवासी स्त्रियांचे कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाचे विश्लेषण.

४. प्रधान आदिवासी स्त्रियांचे सांस्कृतिक जीवनाचे विश्लेषण.

५. प्रधान आदिवासी स्त्रियांच्या शैक्षणिक व आरोग्यविषयक जीवनाचे विश्लेषण.

६. तथ्यांचे विश्लेषण व विवेचन.

७. संशोधनाचे निष्कर्ष आणि शिफारशी

१) प्रकरण १ : प्रस्तावना

या पहिल्या प्रकरणात विषयाचे प्रास्ताविक मांडून संशोधन विषयाचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे संशोधनासाठी प्रस्तुत विषय निवडण्यामागील उद्देश स्पष्ट करून संशोधनाची उद्दिष्ट्ये व गृहितकांची मांडणी करण्यात आली आहे.

२) प्रकरण २ : संशोधन पद्धती व पूर्व संशोधन साहित्याचा आढावा

या प्रकरणात संशोधन पद्धती व संबंधित संशोधन साहित्याचा आढावा घेतला जाईल.

३) प्रकरण ३ : प्रधान आदिवासी स्त्रियांचे कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाचे विश्लेषण

या तिसऱ्या प्रकरणात किनवट तालुक्यातील प्रधान जमातीतील स्त्रियांना कुटंबात मिळणारे स्थान, कुटुंबात निर्णय प्रक्रियेत मिळणारे स्थान, राहणीमान, दर्जा, नातेसंबंध, इत्यादींचा वेध घेतला आहे. तसेच प्रधान जमातीतील प्रथा, परंपरा, उत्सव, लग्नविधी, सामाजिक प्रश्न, समस्या इत्यादींचा अभ्यास केला आहे.

४) प्रकरण ४ : प्रधान आदिवासी स्त्रियांचे सांस्कृतिक जीवनाचे विश्लेषण

प्रस्तुत प्रकरणात किनवट तालुक्यातील प्रधान स्त्रियांच्या संस्कृतीचा अभ्यास करण्यात येणार आहे. विविध कला, आविष्कार, नृत्ये, लोकगीते, इत्यादींचा वेध घेतला आहे.

५) प्रकरण ५ : प्रधान आदिवासी स्त्रियांच्या शैक्षणिक व आरोग्यविषयक जीवनाचे विश्लेषण

प्रस्तुत प्रकरण पाचमध्ये किनवट तालुक्यातील प्रधान आदिवासी स्त्रियांची शैक्षणिक स्थिती, त्यांचा आरोग्यविषयक प्रश्नांचा आढावा येथे घेतला जाईल.

६) प्रकरण ६ : तथ्यांचे विश्लेषण व विवेचन

प्रस्तुत प्रकरणामध्ये किनवट तालुक्यातील प्रधान जमातीच्या स्त्रियांचे सर्वेक्षण करून, मुलाखत अनुसूची व सारणीआधारे सामाजिक स्थिती स्पष्ट करण्यात येईल.

७) प्रकरण ७ : संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत सातव्या प्रकरणात माहितीचे संकलन केल्यानंतर त्यातून प्राप्त झालेल्या तथ्यावर प्रक्रिया करून निष्कर्ष, त्यानुसार गृहितकृत्यांची पडताळणी केली जाईल व संशोधनातून प्राप्त झालेल्या निष्कर्षांच्या आधारावर शिफारशी सुचविल्या जातील.

१.१३ संदर्भग्रंथसूची :-

१) गारे गोविंद (१९९८), "महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती : समस्या व विकास", आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) प्रदिप आगलावे (२०१६), "आदिवासी समाजाचे समाजशास्त्र", श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३) सावरा मिरा (१९८८), "आदिवासी स्त्रियांच्या समस्या व संघर्ष", आदिवासी संशोधन व प्रकाशन संस्था, पुणे.

४) देवगांवकर शैलजा (२००१), "आदिवासी विश्व", आनंद प्रकाशन, नागपूर.

५) गारे गोविंद (१९९३), "आदिवासींचे शिक्षण", साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

६) मोरे माधव बंडू (२००२), "आदिवासी बोलू लागला", सुगावा प्रकाशन, औरंगाबाद.

७) गारे गोविंद (२०००), "महाराष्ट्रातील आदिवासी जमाती", कॉन्टिनेंन्टल प्रकाशन, पुणे.

८) गारे गोविंद (१९८८), "महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती व विकास", आदिवासी प्रशिक्षण संस्था, पुणे.

९) आत्राम व्यंकटेश, (जाने. १९८९), "गोंडी संस्कृतीचे संदर्भ", श्रीकृष्ण उबाळे प्रकाशन, पुणे.

१०) अनमुलवाड वैजनाथ (२०१२), "आदिवासी समाज संस्कृती", समाज संस्कृती आणि साहित्य (संपा.), इसाप प्रकाशन, नांदेड.

११) श्रीमती वाघ अनुताई (१९८८), "आदिवासी विकास आणि शिक्षण" या लेखातून आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे.

संशोधिका
कु.मांजरमकर सोनी श्रीरंगराव

मार्गदर्शक
प्रा.डॉ.चव्हाण ज्ञानेश्वर शेषराव
समाजशास्त्र विभाग,
शारदा महाविद्यालय, परभणी